**प्रपत्र सी – ७**

**वृत्तपत्रे, समाजमाध्यमे व पक्षाच्या संकेतस्थळावर प्रसिद्धी करण्यासाठी राजकीय पक्षांकरीता ज्याची उमेदवार म्हणून निवड झालेली आहे, तसेच इतर गुन्हेगारी पूर्वचरित्र नसलेल्या व्यक्तींची निवड का केली नाही, अशा निवडीच्या कारणांसहित, अशा उमेदवाराबाबतची प्रलंबित फौजदारी खटल्यांसह माहिती**

राजकीय पक्षाचे नाव : **शिवसेना**
निवडणुकीचे नाव : **विधानसभा सार्वत्रिक निवडणूक – २०२४**
राज्याचे / संघराज्य क्षेत्राचे नाव : **महाराष्ट्र**

१) मतदारसंघाचे नाव : **२०२ – पुरंदर विधानसभा**
२) उमेदवाराचे नाव : **विजय सोपानराव शिवतारे**

| अ.क्र. | | |
|---|---|---|
| १ | **पूर्ववर्ती गुन्हेगारी** | |
| | अ. गुन्ह्याचे स्वरूप | १. भा.द.वि.क. ११७,१२० (ब) ,१५३ (अ), १७७, १८२, २०३,५०४, ५०५,३४, आरोपी यांनी अपराध घडून येण्यास अपप्रेरणा देऊन कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध करण्याचा बेत लपवून धर्म, वंश, जन्मस्थान, निवास, भाषा इ. कारणावरून निरनिराळ्या गटामध्ये शत्रुत्व वाढवून एकोपा टिकण्यास बाधक कृती करून खोटी माहिती पुरवून लोक सेवकाला खोटी माहिती देणे कायदेशीर अधिकाराचा वापर दुसऱ्या व्यक्तीला नुकसानकारक होईल अशी कृती करून घडलेल्या अपराधाबाबत खोटी माहिती देऊन शांतता भंग घडवून आणण्याच्या उद्देशाने अवमान करून सार्वजनिक आगळीक होण्यास सादर अशी विधाने संगनमताने केल्याचा गुन्हा दाखल आहे. |
| | | २. भा.द.वि.क. १४३,१४१, बॉम्बे कायदा १३५ आरोपी यांनी बेकायदेशीर जमाव जमवून जिल्हाधिकारी यांनी केलेल्या आदेशाचा भंग केल्याचा गुन्हा आहे. |
| | | ३. भा.द.वि.क. १४३,१४५,१४९, मुंबई पोलीस कायदा १३५, बेकायदेशीर जमावाला पांगण्याचा आदेश दिला हे माहित असूनही त्यात सामील होऊन जिल्हाधिकारी यांनी काढलेल्या आदेशाचा भंग केल्याचा गुन्हा दाखल आहे. |
| | | ४. ५००,३४, आरोपीने संगनमताने अब्रू नुकसान केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. |
| | ब. प्रकरण क्रमांक | १. २/२०१३ |
| | | २. ८४/२०११ |
| | | ३. ८६/२०१० |
| | | ४. समरी फौ. ख.नं. ३८/२०१७ |
| | क. न्यायालयाचे नाव | १. मे. जुन्नर न्यायालय |
| | | २. मे. भोर न्यायालय |
| | | ३. ज्युडी, मॅजी वर्ग १ पुणे कोर्ट नं. ७ पुणे. |
| | | ४. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी सो जुन्नर ता. जुन्नर जि. पुणे. |
| | ड. दोषरोप निश्चित केले आहेत किंवा नाही (होय / नाही ) | अनु. क्र. १ ते ४ – नाही |
| | इ. दोषसिद्धीचा दिनांक, असल्यास | निरंक |
| | फ. झालेल्या शिक्षेचा तपशील, असल्यास | निरंक |
| | ग. द्यावयाची आवश्यक इतर कोणतीही माहिती | निरंक |
| २ | उमेदवाराच्या निवडीकरिता कारणे निवड हि उमेदवाराची अर्हता, संपादणूक व गुणवत्तेच्या संदर्भात असेल व केवळ मतदानात “निवडून येण्याची क्षमता” अशी नसेल (१०० शब्दांपेक्षा जास्त नाही) | माहिती सोबत जोडली आहे |
| ३ | गुन्हेगारी पूर्वचरित्र नसलेल्या इतर व्यक्तींची उमेदवार म्हणून निवड का होऊ शकत नाही याची कारणे (१०० शब्दांपेक्षा जास्त नाही) | माहिती सोबत जोडली आहे |

**अनु.क्र. २**

उमेदवार या मतदार संघाचे १३ व्या विधानसभेचे आमदार होते. उत्तम वक्ता म्हणून उमेदवाराची ओळख आहे. उमेदवाराने पक्षाचे प्रवक्ते म्हणून देखील काम केलेले आहे. जलसंपदा विभागाचे राज्याचे राज्यमंत्री पद भूषविले आहे. पुरंदर मतदारसंघाची उमेदवाराला पूर्ण कल्पना आहे. येथील भात शेती करणाऱ्या व अन्य उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या तसेच कष्टकऱ्यांच्या समस्यांची त्यांना पूर्ण जाणीव आहे. मतदार संघाच्या विकासासाठी आणि नजिकच्या धरणातून शेतीसाठी अधिकाधिक जलसंपदा उपलब्ध करून घेण्याकरिता सातत्याने प्रयत्न करित असतात. सर्वसामान्य जनतेत मिसळणारा साधी रहाणी असलेला कार्यकर्ता म्हणून ओळख आहे. या सर्वाचा विचार करून शिवसेना पक्षातर्फे **श्री. विजय सोपानराव शिवतारे** यांना उमेदवारी देण्यात आली आहे. इतर इच्छुक उमेदवारांनी निवडणुकीकरीता या उमेदवारास पाठींबा दिला आहे.

**अनु.क्र. ३**

उमेदवारावर शांतता भंग होईल, लोक सेवकांना खोटी महिती देणे, बेकायदेशीर जमाव जमविणे आणि मोर्चा काढणे आशा प्रकारचे गुन्हे दाखल असेल तरी दोषारोप सिद्ध झालेले नाहीत. आक्रमकपणे जनतेच्या मागण्या मांडणे, आणि प्रसंगी स्पष्टपणे व सडेतोडपणे व आग्रहाने न्यायासाठी लढणे अशा प्रकारची लढाऊ वृत्ती असलेला अन्य कोणताही उमेदवार मतदारसंघात आढळला नाही. त्यामुळे अन्य व्यक्तींची निवड करण्यात आली नाही.

शिवसेना मध्यवर्ती कार्यालय

**आपला,**

**संजय भाऊराव मोरे**
**शिवसेना सचिव**